# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 25.11.2022** **वारः शुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

थोर सेनानी लचित बारफुकन यांच्या जयंती महोत्सवाचा समारोप आज पंतप्रधानांच्या उपस्थितीत होणार
गुजरात विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठीचा प्रचार शिगेला
दिव्यांग सक्षमीकरणात महाराष्ट्राला सात राष्ट्रीय पुरस्कार जाहीर
आणि
भारत - न्यूझीलंड दरम्यान 50 षटकांच्या पहिल्या सामन्याला ऑकलंडमध्ये सुरुवात; न्यूझीलंड चा क्षेत्र रक्षणाचा निर्णय

**लचित बारफुकन**

अहोम राज्याच्या सेनेचे थोर सेनापती लचित बारफुकन यांच्या 400 व्या जयंती महोत्सवाच्या समारोप समारंभाला पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत उपस्थित राहणार आहेत. आसाम सरकारनं लचित बारफुकन यांच्या शौर्याबद्दल आणि देशभक्तीबद्दल लोकांना अधिक माहिती देण्यासाठी दिल्लीत तीन दिवसीय कार्यक्रम आयोजित केले आहेत.यानिमित्तानं एक प्रदर्शन आणि पॅनल चर्चाही आयोजित करण्यात आली आहे. लचित बारफुकन हे आसामच्या अहोम राज्याचे सेनापती होते.औरंगजेबाच्या नेतृत्वाखाली मुघलांनी केलेल्या चढायांना निर्धारानं तोंड दिलं.लचित बारफुकन हे अतुलनीय धैर्याचे प्रतीक असून,त्यांनी लोकांच्या कल्याणाला उच्च स्थान दिले,असं पंतप्रधानांनी लचित दिनानिमित्त दिलेल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.या वर्षी फेब्रुवारीमध्ये तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते गुवाहाटी इथं या उत्सवाचं उद्घाटन करण्यात आलं होतं. दरम्यान, लचित यांना श्रद्धांजली म्हणून मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या आवाहनानंतर आसामच्या लोकांनी काल रात्री राज्यभर पणत्या लावून त्यांच्या शौर्याचे स्मरण करत त्यांना आदरांजली वाहिली.

**मोदी-मलेशिया पंतप्रधान**

मलेशियाचे नवे पंतप्रधान म्हणून अन्वर इब्राहिम यांची निवड झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.मलेशियासोबतची धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ करण्यासाठी एकत्र काम करण्यास उत्सुक असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या ट्विटर संदेशात म्हटलं आहे.अन्वर इब्राहिम यांनी काल एका समारंभात पंतप्रधान पदाची शपथ घेतली. 1990 मध्ये ते मलेशियाचे उपपंतप्रधान होते.

**गुजरात निवडणूक**

आगामी गुजरात विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्या साठीचा प्रचार आता शिगेला पोहचला असून,सर्वच पक्षांचे नेते प्रचारसभा,रोड शो आदी माध्यमातून उमेदवारांचा जोरदार प्रचार करत आहेत.आज गुजरातमध्ये माहुडा, जालोड, वाघारा आणि नरोडा इथ केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सभा होत असून,केंद्रीय मंत्री

स्मृती ईराणी वलसाड जिल्ह्यात दोन प्रचारसभांमध्ये भाग घेणार आहेत. कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते राजीव शुक्ला आणि अलोक शर्मा अहमदाबाद इथ पत्रकार परिषद घेणार असून, आम आदमी पक्षाचे अनेक ज्येष्ठ नेते तसच पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान हे देखील अनेक ठिकाणी रोड शो करणार आहेत.
दरम्यान, पहिल्या टप्प्यात गुजरात विधानसभेच्या 89 जागांसाठी येत्या 1 डिसेंबरला  मतदान होणार असून,यासाठी विविध पक्षांचे 788 उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत . यापैकी 167 उमेदवारांवर विविध गुन्हे दाखल असून,त्यापैकी 100 जणांवर खून,बलात्कार आदी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत .

**हॅकेथॉन**
उत्तर प्रदेशातील गौतम बुद्ध विद्यापीठात युनेस्को-इंडिया-आफ्रिका हॅकेथॉनचा समारोप उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.यावेळी ते उपस्थित युवा संशोधकांना संबोधित करणार आहेत.22 नोव्हेंबरपासून सुरू  झालेल्या या हॅकेथॉनमध्ये भारतासह आफ्रिकन देशातील युवा संशोधक सहभागी झाले आहेत.जगातील सामाजिक, पर्यावरणीय आणि तांत्रिक आदी विविध समस्या सोडवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा शोध घेण्याची संधी कार्यक्रमातून दिली जाते.संभाव्य स्टार्टअपसाठी हे महत्त्वाचे व्यासपीठ असून अनेक युवा विद्यार्थ्यांना आपल्या नावीन्यपूर्ण संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि आर्थिक मदत मिळते.

**भारत**
नामशेष होत चाललेल्या लिथ सॉफ्ट शेल कासवाच्या प्रजातींच्या संरक्षणाचा भारतानं मांडलेला प्रस्ताव पनामा आंतरराष्ट्रीय व्यापार अधिवेशनात मंजूर झाला आहे.यामुळे या प्रजातींच्या कासवांच्या अवैध व्यापाराला आळा बसण्यास मदत होईल. गेल्या 30 वर्षांपासून कासवांच्या या प्रजातीची मोठ्या प्रमाणात शिकार होत असून, परदेशात अवैध व्यापार केला जात आहे.त्यामुळं गेल्या 30 वर्षांत त्यांची संख्या 90 टक्क्यांनी कमी झाल्याचा अंदाज आहे. त्यांच्या संवर्धनासाठी भारतानं हा प्रस्ताव मांडला आहे.

**इफ्फी**
गोव्यात सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फीतील ‘75 क्रिएटिव्ह माइंड्स ऑफ टुमारो’ च्या दुसऱ्या आवृत्तीचा समारोप “53-तासांचे आव्हान”स्पर्धेच्या पुरस्कार सोहळ्यानं झाला. शॉर्ट्स टीव्हीच्या सहकार्याने राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळानं ही स्पर्धा आयोजित केली होती.शताब्दी वर्षातील भारत या संकल्पनेवर आधारीत लघुपट 53 तासांत तयार करण्याचे आव्हान अशा स्वरुपाच्या या स्पर्धेत देशभरातून निवडलेल्या 75 स्पर्धकांनी पाच लघुपट तयार केले. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांच्या हस्ते 21 तारखेला याचा प्रारंभ झाला होता.चित्रपट निर्मात्यांनी चित्रीकरणापासून ते चित्रपट वितरणापर्यंत सर्व काम या 53 तासांत केले.या स्पर्धेत टीम पर्पलने बनवलेला ‘डियर डायरी’ हा लघुपट सर्वोत्कृष्ट ठरला आहे.यात महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा अधोरेखित करण्यात आला आहे.याशिवाय अंतरदृष्टी (द इनसाइट),द रिंग, ऑलमोस्ट आणि सौ का नोट हे अन्य चार लघुपट असून हे सर्व पाच लघुपट रविवारी रात्री 9 वाजता शॉर्ट्स टीव्हीवर प्रसारित केले जाणार आहेत.

**दिव्यांग पुरस्कार**
सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीनं देण्यात येणाऱ्या दिव्यांग सक्षमीकरणात महाराष्ट्राला सात पुरस्कार जाहीर झाले  आहेत. ‘सुगम्य भारत अभियान’ ची अंमलबजावणी करणारे सर्वश्रेष्ठ राज्य म्हणून

यंदाच्या वर्षासाठी हा पुरस्कार पुण्याच्या दिव्यांग कल्याण आयुक्तालयाला जाहीर झाला आहे. सर्वश्रेष्ठ दिव्यांग व्यक्ति पुरस्कार अशोक तुकाराम भोईर, विमल गव्हाणे, डॉ. शुभम रामनारायण धूत, जयसिंग चव्हाण याना जाहीर झाला असून ,अकोला जिल्हा परिषद आणि औरंगाबादच्या महात्मा गांधी सेवा संघ यांचाही या राष्ट्रीय पुरस्कारात समावेश आहे.जागतिक दिव्यांग दिनानिमित्त येत्या ३ डिसेंबर रोजी राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्लीत या पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

**राष्ट्रपती भवन**

येत्या 1 तारखेपासून डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात 5 दिवस, नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवन सर्वसामान्य नागरिकांना पाहण्यासाठी खुल राहणार आहे.डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात बुधवार ते रविवार असे पाच दिवस सरकारी सुट्ट्या सोडून,सकाळी 10 ते 4 या वेळेत एक तासाचे विभाग पाडण्यात असून,त्यासाठी नागरिक वेळ आरक्षित करू शकतात.तसच राष्ट्रपती भवनाच्या संग्रहालयाला ही नागरिक भेट देऊ शकतात.दर शनिवारी सकाळी 8 ते 9 या वेळेत राष्ट्रपतींच्या अंगरक्षकांचा सुरक्षा खांदेपालट कार्यक्रम ही नागरिक पाहू शकतात.या सर्वांच आरक्षण नागरिक राष्ट्रपती भवन सचिवालयाच्या संकेतस्थळावर करू शकतात.

**मुख्यमंत्री**

मराठवाडा आणि विदर्भातल्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कृषी प्रकल्पांसोबतच, दुष्काळग्रस्त भागात पुराचे पाणी वळवण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राज्य शासनानं तयार केला असून ,त्यासाठी जागतिक बॅंकेने अर्थसहाय्य करावं,असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं.जागतिक बॅंकेचे भारतातील प्रमुख, ऑगस्टे तानो कौमे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबईत भेट घेतली. या बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान 50 षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना न्यूझीलंडमधील ऑकलंड इथल्या इडन पार्क मैदानावर सुरू आहे.रोहित शर्मा आणि के एल राहुल यांच्या अनुपस्थितीत भारतीय संघाच्या कर्णधारपदाची धुरा शिखर धवन याच्याकडं आहे. नाणेफेक जिंकलेल्या न्युझीलंडने प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या 20षटकांत 2चेंडूत बिनबाद 96 धावा झाल्या होत्या.या मालिकेतला दुसरा सामना येत्या रविवारी तर तिसरा सामना बुधवारी खेळला जाईल.

**फिफा**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत काल रात्री दोहा इथ एच गटात झालेल्या रोमांचक सामन्यात पोर्तुगालने घानाच्या  संघाला 3-2 ने पराभूत केल पोर्तुगालचा कर्णधार क्रिस्टीयानो रोनाल्डो याने कालच्या सामन्यात गोल करून विश्वविक्रम केला .2005, 2010 ,2014 ,2018 आणि 2022 अशा पाच फिफा स्पर्धेत गोल करण्याचा विश्वविक्रम त्याच्या नावावर काल नोंदवण्यात आला.या स्पर्धेच्या  जी गटात काल ब्राझील ने सर्बिया ला 2-0 ने हरवलं ,तर दक्षिण कोरिया आणि उरूग्वे यांच्यातील सामना अनिर्णीत राहिला.आज या स्पर्धेत विविध गटात चार सामने होणार आहेत.

**भारोत्तोलन**
पुढील महिन्यात कोलंबिया इथं होणाऱ्या जागतिक भारोत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या मीराबाई चानूच्या नेतृत्वाखाली भारताचा पाच खेळाडूंचा संघ मैदानात उतरणार आहे. 5 ते 16 डिसेंबर दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेतून 2024 मध्ये होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकसाठी खेळाडूंची निवड होणार आहे. त्यामुळे ही स्पर्धा मीराबाई चानूसह सर्वांसाठी महत्त्वाची स्पर्धा आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं; नमस्कार.**